**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले • अंक २८३ वा • सोमवार ०४ मार्च २०२४ • पाने ४ • किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 283 | Date : 04/03/2024 blow :Monday Page 4 Price 4


## ३४ केंद्रीय मंत्री रिंगणात, भाजपची पहिली यादी जाहीर

### पंतप्रधान मोदी वाराणसीतून, मीनाक्षी लेखी यांच्यासह तीन मंत्र्यांना वगळले

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधील १९५ उमेदवारांची पहिली यादी शनिवारी जाहीर केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा वाराणसीमधून, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दुसऱ्यांदा गांधीनगरमधून, तर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह पारंपरिक लखनौमधून निवडणूक लढवतील. या यादीमध्ये ३४ मंत्री, दोन माजी मुख्यमंत्री, २८ महिला आणि सर्वाधिक ५७ ओबीसी उमेदवारांचा समावेश आहे. दिल्लीत गुरुवारी पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत झालेल्या भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत प्रामुख्याने 'अ' आणि 'ड' वर्गवारीतील लोकसभा मतदारसंघांची घोषणा करण्यात आली होती. पक्ष केवळ भाजपचीच नव्हे तर 'एनडीए'ची व्याप्ती वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्यामुळे भाजपलाच नव्हे, तर देशातील जनतेला 'फिर एक बार मोदी सरकार'



सत्तेवर आलेले हवे आहे, राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

गुजरातमधील पोरबंदरमधून केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मंडाविया, केरळमधील थिरुवनंथपूरममधून केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर, राजस्थानमधील अलवरमधून केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंदर यादव आणि केंद्रीय नागरी विमानवाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांना पारंपरिक गुना मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. केंद्रीयमंत्री सर्बानंद सोनोवाल यांना आसाममधील दिब्रुगढमधून तर व्ही. मुरलीधरन यांना केरळमधील अट्टिंगळमधून संधी देण्यात आली आहे. राज्यसभेच्या सदस्या आणि महाराष्ट्राच्या माजी प्रभारी सरोज पांडे यांना छत्तीसगढमधील कोरबा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झाली आहे.

अमेठी मतदारसंघातून केंद्रीयमंत्री स्मृती इराणी यांना, तर मथुरामधून हेमामालिनी, गोरखपूरमधून रवीकिशन यांना पुन्हा । पान २ वर

## नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई


नवी दिल्ली : या निवडणुकीत प्रचार करताना धर्म, जात, भाषेच्या आधारावर मते मागू नयेत. सेच देव आणि भक्त यांच्यातील नात्याचा अवमान होईल अशी विधाने करू नयेत, असे केंद्रीय निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांना सांगितले आहे. लोकसभा निवडणुकीची कोणत्याही क्षणी घोषणा होऊ शकते. अगदी काही दिवसांवर ही निवडणूक आल्यामुळे राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राजकीय नेत्यांचे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्याचे प्रमाणही वाढले आहे. दरम्यान, लवकरच निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार असून या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. स्टार प्रचारक, पक्ष तसेच उमेदवार यांनी आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल,

असा इशारादेखील निवडणूक आयोगाने दिला. मशीद, चर्च, गुरुद्वारा तसेच अन्य प्रार्थनास्थळांचा निवडणुकीच्या प्रचारासाठी उपयोग करू नये, असेही निवडणूक आयोगाने सांगितले.

## भारतीय नौदल मालदीवच्या जवळ उभारणार लष्करी तळ!

मालदीवः गेल्या काही दिवसांपासून मालदीव आणि भारत यांच्यातील संबंध ताणले आहेत. मालदीवमध्ये असलेले भारताचे सैन्य माघारी घ्यावे, अशी भूमिका येथील सरकारने घेतलेली आहे. दुसरीकडे मालदीवची चीनशी जवळीक वाढली आहे. दरम्यान, चीनच्या विस्तारवादी भूमिकेला आळा घालता यावा म्हणून भारताने मालदीवच्या जवळ एक लष्करी तळ उभारण्याचे ठरवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार मालदीवमध्ये असलेले भारताचे सैन्य परत मायदेशी येण्यास सुरुवात होण्याआधी मालदीवच्या शेजारी उभारण्यात येणारे हे लष्करी तळ कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. मालदीवमध्ये सत्ताबदल झाला असून येथे चीनचे समर्थक मोहम्मद मुईझ हे राष्ट्रध्यक्षपदी विराजमान झाले आहेत. आम्ही सत्तेत आल्यानंतर मालदीवमध्ये असलेल्या भारतीय सैन्याला परत पाठवू असे आश्र्वासन तेथील नागरिकांना दिले होते. याच कारणामुळे भारत मालदीवच्या जवळ आपले लष्करी तळ उभारत आहे. सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या बेटांवर भारतीय नौदलाकडून आपल्या सैन्याला बळ देण्याचा प्रयत्न यातून केला जातोय, असे भारतीय नौदलाने म्हटलंय. लक्षद्वीपमध्ये उभारण्यात येणाऱ्या भारतीय लष्कराच्या नव्या तळाचे येत्या ६ मार्च रोजी उद्घाटन होणार आहे. भारताचा लक्षद्वीप हा भूभाग मालदीवच्या उत्तरेस सुमारे १३० किमी अंतरावर आहे. लक्षद्वीपच्या मिनिकॉय बेटावर हे नवे लष्करी तळ असणार आहे. भारतीय नौदलाचे याआधीच लक्षद्वीपच्या कावरात्ती बेटावर एक लष्करी तळ आहे. मात्र नवे लष्करी तळ हे मालदीवच्या आणखी जवळ असणार आहे.


## प्रकाश आंबेडकरांकडून लोकसभेच्या तीन उमेदवारांची नावं जाहीर



अकोला : गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडीची युती होणार की नाही, याबद्दल अनेकांना उत्सुकता लागून राहिली आहे. महाविकास आघाडी आणि वंचितमध्ये लोकसभेच्या जागावाटपाची बोलणी सुरु असल्याच्या बातम्याही अधुनमधून येत होत्या. मात्र, मविआ आणि वंचितचे जागावाटपाचे सूत्र निश्र्चित होऊ शकले नव्हते. परंतु, आता प्रकाश आंबेडकर यांनी परस्पर लोकसभेच्या तीन जागांवरील उमेदवार जाहीर करुन टाकले आहेत. त्यामुळे आता वंचित आणि मविआतील बोलणी फिस्कटल्याचे दिसत आहे. आता मविआला प्रकाश आंबेडकरांची मनधरणी करण्यात यश न मिळाल्यास २०१९ प्रमाणे वंचित बहुजन आघाडी पुन्हा 'एकला चलो रे'च्या भूमिकेत दिसेल.प्रकाश आंबेडकर यांनी रविवारी अकोल्यात पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी लोकसभेच्या तीन जागांवरील वंचितचे उमेदवार जाहीर केले. यामध्ये अकोल्यातून स्वत: प्रकाश आंबेडकर लढतील. तर वंचितकडून वर्धा येथे प्रा. राजेंद्र साळुंखे आणि सांगलीतून चंद्रहार पाटील यांना लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता मविआचे नेते हे परस्पर झालेले जागावाटप मान्य करुन वंचितला आपल्यात सामावून घेणार का, हे पाहावे लागेल.

## भाजप फक्त रामनामाचा जप करतं, त्यांना देशाची पर्वा नाही : उद्धव ठाकरे


मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकीत राज्यातील नागरिकांनी जातपात, धर्म बाजूला ठेवून मतदान केले पाहिजे. कारण आपण टिकलो तर आपण धर्म टिकवू. देशाला वाचवणे हाच आपला धर्म आहे. आशीर्वादासाठी देव पाठिशी हवा पण देश हा आपल्या नजरेसमोर असला पाहिजे. आज हे लोक देव समोर ठेवतायत पण देश कुठे टाकलाय हे त्यांनाही कळत नाही, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी भाजपला लक्ष्य केले. भाजपवाले फक्त रामनामाचा जप करत आहेत. मग भाजपने देशात रामराज्यच आणावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी लक्षद्वीप आणि द्वारकेला समुद्राच्या तळाशी जाऊन आले पण त्यांना मणिपूरला जाता येत नाही. रामभक्ती करावी, हे भाजपने आम्हाला सांगण्याजी गरज नाही, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले. ते रविवारी धारावीत आयोजित करण्यात आलेल्या सभेत बोलत होते.या सभेत उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार टीका केली. आम्ही हिंदुत्त्वासाठी भाजपसोबत होतो. पण भाजपने आम्हाला दोनवेळा फसवले. आम्ही भाजपचं आताच हिंदुत्त्व मानत नाही. आमचं हिंदुत्त्व हे घरात चूल पेटवणारं आहे. तर भाजपचं हिंदुत्त्व हे लोकांची घरं पेटवणारं आहे, अशी टीकाही उद्धव ठाकरे यांनी केली.



मी लोकांमध्ये आणि शेतकऱ्यांना सातत्याने भेटत आहे. ग्रामीण भागातील माझ्या सभांना शेतकरी मोठ्याप्रमाणावर असतात. त्यांच्यापैकी अनेकांना मी मविआ सरकारच्या काळात सरकारने केलेल्या कर्जमुक्तीचा लाभ मिळाला का, हे जाहीरपणे विचारतो. ते मदत मिळाल्याचे सांगतात. मात्र, सध्याच्या घटनाबाह्य सरकारने जाहीर केलेली कोणतीही मदत आपल्यापर्यंत पोहोचलीच नाही, असे हे शेतकरी सांगत असल्याचा दावा उद्धव ठाकरे यांनी केला.

आपल्या भाषणात उद्धव ठाकरे यांनी इंडिया आघाडीतील वेगवेगळ्या विचारसरणीच्या पक्षांनी एकत्र येण्याच्या निर्णयाचे समर्थन केले. भाजपकडे मोदींशिवाय पर्याय आहे का? भाजप तेच प्रोडक्ट वारंवार लाँच करत आहे. आम्ही मोदींविरोधात नव्हे तर हुकूमशाही विरोधात एकत्र येत आहोत. आम्हाला देशातील लोकशाही टिकवायची आहे. आमचा विरोध मोदी किंवा भाजपला नाही तर हुकूमशाही वृत्तीला आहे. त्यामुळे वेगवेगळी विचारसरणी आलेले आम्ही सगळे पक्ष एकत्र आल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

## शाहबाज शरीफ पाकिस्तानचे नवे पंतप्रधान; दुसऱ्यांदा मिळाली संधी



नवी दिल्ली : पाकिस्तानमध्ये काही दिवसांपूर्वी सार्वत्रिक निवडणुका संपन्न झाल्या. मात्र त्रिशंकू परिस्थिती उद्भवल्यामुळे एकाही पक्षाला बहुमत सिद्ध करता आले नव्हते. त्यानंतर सत्तास्थापनेसाठी पाकिस्तान मुस्लीम लिग-नवाझ (पीएमएल-एन) आणि पाकिस्तान पिपल्स पार्टी (पीपीपी) यांच्यात चर्चा चालू होती. आघाडीवर एकमत झाल्यानंतर पंतप्रधानपदी शाहबाज शरीफ (७२) यांची दुसऱ्यांदा घोषणा करण्यात आली आहे. ३३६ सदस्यसंख्या असलेल्या सभागृहात दोन्ही पक्षांचे २०१ सदस्य आहेत. त्यामुळे शाहबाज शरीफ यांची एकमताने पंतप्रधानपदी निवड करण्यात आली. शाहबाज शरीफ यांना आव्हान देणारे ओमर आयुब खान यांना केवळ ९२ सदस्यांचा पाठिंबा मिळू शकला. ओमर आयुब हे कारावासात असलेल्या इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) या पक्षाचे नेते आहेत.

## सोलापूर शहरातील ९२ हजार बालकांना पोलिओ डोस



सोलापूर/प्रतिनिधीः देशभरात तसेच सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ० ते ५ वर्षे वयोगटातील ९२ हजार ५७६ बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला. एकूण ८६ टक्के बालकांना हा डोस देण्यात आला. रविवारी, राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम २०२४ अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी प्रसूतिगृह ओपीडी विभाग येथे आज (रविवारी) राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेस महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. मंजिरी कुलकर्णी, प्रजनन माता बाल संगोपन अधिकारी डॉ. वैशाली शिरशेट्टी, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. आशिष बोराडे, बालरोग संघटना सोलापूरचे अध्यक्ष डॉ. आण्णासाहेब लोखंडे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सोडल आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

या मोहिमेमध्ये एकूण १ लाख ७ हजार ५२६ बालकांपैकी रविवारी शहरातील ९२ हजार ५७६ बालकांना पोलिओचा डोस दिला आहे. प्रवास करणाऱ्या बालकांना पोलिओ लस पाजण्यासाठी एसटी स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन, मंदिरे, मॉल, टोल नाके इत्यादी सार्वजनिक ठिकाणी पोलिओ लसीकरण केंद्रे स्थापन करण्यात आली होती. पोलिओ लसीकरण मोहिमेसाठी महापालिकेच्या कार्यक्षेत्रासाठी ३८० लसीकरण केंद्रे स्थापन करण्यात आली. साधारणपणे १०८९ आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा कार्यकर्ती, स्वयंसेवक व खासगी वैद्यकीय संघटना आदींच्या प्रयत्नातून ही मोहीम राबविण्यात आली आहे.

३ मार्च २०२४ रोजी काही कारणांनी बूथवर येऊ न शकलेल्या बालकांना ४ ते ८ मार्च २०२४ या कालावधीत त्यांच्या घरोघरी जाऊन पोलिओ लस देण्यात येणार आहे.

ही मोहीम महापालिका आयुक्त, उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत राबवली जाणार आहे. एकही मूल पोलिओ लसीकरणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता प्रत्येक स्तरावर घेण्यात येत आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण घरांची संख्या २ लाख १५ हजार ८७७ इतकी असून ४ ते ८ मार्च २०२४ या कालावधीत घरोघरी जाऊन राहिलेल्या बालकांना पोलिओ डोस देण्यासाठी आयपीपीआय टीम संख्या २१६, ट्रान्सीट टीम ७६ व मोबाइल टीम २० कार्यरत असणार आहेत.

## आता पाचवी आणि आठवीची वार्षिक परीक्षा होणार

नागपूर : सरकारने नव्या शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिली असून, तब्बल ३४ वर्षांनंतर देशात नवे शैक्षणिक धोरण लागू होणार आहे. राज्यात येत्या शैक्षणिक वर्षापासून नवे शैक्षणिक धोरण लागू केले जाणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून शिक्षण पद्धतीत अनेक मोठे बदलही करण्यात आले आहेत. यात गुणवत्तेला अधिक प्राधान्य आहे. म्हणून शालेय शिक्षणात दोन टप्प्यांवर विद्यार्थ्यांची गुणवत्ता जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मध्ये राज्य सरकारने सुधारणा केली आहे. यासाठी गुणवत्तेच्या दृष्टीने पहिलीपासून आठवीपर्यंत नापास करायचे नाही, हे परवडणारे नाही, हे लक्षात आल्यावर शालेय शिक्षण विभाग यावर्षीपासून पाचवी आणि आठवीच्या वर्गांच्या वार्षिक परीक्षा घेणार आहे.



पाचवी आणि आठवी या टप्प्यांवर प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणवत्तेची परीक्षा होणार आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या अनुदानित आणि विनाअनुदानित सर्व शाळांना हा नियम लागू असेल. बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत अनुत्तीर्ण करता येत नव्हते. मात्र, विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करण्याची सक्ती या कायद्यात होती. त्याकडे दुर्लक्ष झाल्याने विद्यार्थी बहुतांश विषयात कच्चा राहू लागले. त्यांची गुणवत्ता थेट नववीच्या वार्षिक परीक्षेत मोजली जाऊ लागल्याने विद्यार्थी परीक्षेत अपयशी ठरत होते.सुधारित नियमांनुसार, इयत्ता पाचवीच्या वर्गापर्यंत बालकाला वयानुरूप वर्गामध्ये प्रवेश देण्यात येईल. इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरूप प्रवेश देताना बालकास पाचवीच्या वर्गासाठीची विहित केलेली वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

बालक ही परीक्षा उत्तीर्ण नसल्यास। पान २ वर

## लातूरमध्ये अपघातात नांदेडचे चार तरुण ठार

लातूर : उसाच्या ट्रॅक्टरला पाठीमागून भरधाव कारने दिलेल्या धडकेत चार तरुणांचा मृत्यू झाला आहे. तर एक गंभीर जखमी झाला. मृत व जखमी नांदेडमधील रहिवासी असून ते तुळजापूरला देवदर्शनासाठी निघाले होते.

ही घटना रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास लातूर महामार्गावरील आष्टामोड ते महाळंगरा पाटीदरम्यान घडली आहे. राष्ट्रीय महामार्गावर रसायन वाहून नेणारा टँकर उलटून अपघात, प्रथम दर्शनी अमोनिया असल्याचा अंदाज; परिसरात भीतीचे वातावरण कारमधील शिवराम हरिश्र्चंद्र लंकाढाई (वय २६), मोनू बालाजी



कोतवाल (२७), नरमन राजाराम कात्रे (३३) व कृष्णा यादव (सर्व रा. नांदेड) यांचा अपघातात मृत्यू झाला. तर शुभम किशोर लंकाढाई हा गंभीर जखमी झाला आहे. नांदेड येथील पाच तरुण कारमधून लातूर मार्गे तुळजापूरला जात होते. अपघातात कारमधील दोघे जण जागीच ठार झाले तर तिघांना लातूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे अन्य दोघेजण मरण पावले.

## संपादकीय

### काळजी जरांगेंनी घेणे योग्य..

मराठा आरक्षणाच्या प्रश्नाने अनेक वळणे घेतली. अगदी काँग्रेस आघाडी सरकारच्या काळापासून तब्बल तीनवेळा मराठा समाजाच्या आशा पल्लवित केल्या गेल्या. पण नंतर त्यात काहीना काही तरी कायदेशीर त्रुटी निघून न्यायालयाच्या कात्रीत हे आरक्षण दोनवेळा अडकले. आता तिसऱ्या वेळेस शिंदे-फडणवीस-पवार सरकारने मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण दिले आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात २५ जून २०१४ मध्ये मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देणारा (एसईबीसी) अध्यादेश जारी केला होता. पण नंतर तो कायद्यासमोर टिकला नाही. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने २९ नोव्हेंबर २०१८ मध्ये विधिमंडळात याविषयी मांडलेले विधेयक एकमुखाने मंजूर झाले. आता पुन्हा मराठा समाजाला शिक्षणासह सरकारी, निमसरकारी नोकरीत दहा टक्के आरक्षण देण्यात आले आहे. मुळात जालन्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे-पाटील हे उपोषणाला बसले होते. तिथे झालेल्या लाठीमारामुळे ते प्रकाशझोतात आले. जरांगे यांच्या मागणीनुसार कुणबी नोंदी गोळा करण्याचे काम सरकारकडून सुरू करण्यात आले. मात्र, ते वारंवार उपोषणाला बसले. एकदा ते थेट मुंबईच्या वेशीवर आले. तेव्हाही राज्य सरकारने कुणबी प्रमाणपत्रामध्ये सगेसोयऱ्यांचा समावेश केल्यानंतर ते माघारी फिरले होते. सरकारने आरक्षण दिलेले असतानाही जातीभेदाचे राजकारण करत जरांगे यांनी संवैधानिक पदावर असलेल्या नेत्याबद्दल अपशब्द काढले. या सर्व घडामोडींची एसआयटी अर्थात विशेष तपास पथकाद्वारे चौकशी करण्याचे आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले आहेत. ही चौकशी झाली आणि जरांगे यांचा 'बोलविता धनी' समोर आला, तर समाजाच्या भावनांशी खेळल्याचा ठपका जरांगेंवर येईल. मुंबई महानगरपालिकेचे माजी उपायुक्त गो. रा. खैरनार यांनी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या विरोधात आरोपांच्या फैरी झाडल्या होत्या आणि त्याला तेव्हाच्या शिवसेना-भाजप युतीने पाठिंबा दिला होता. १९९५ साली युती सत्तेवर येण्यामागची जी कारणे होती, त्यात खैरनार यांचे पवारांवरील आरोपदेखील साहाय्यभूत होते. पण नंतर युतीने खैरनार यांना विचारलेदेखील नाही. त्यामुळे एसआयटी चौकशीत सत्य समोर आले तरी, बळी आपलाच जाऊ शकतो, हे जरांगे यांनी ध्यानात घ्यायला हवे. कारण राजकारणात 'एकमेकांना सांभाळून' घेतले जाते, हे उघड गुपित आहे. म्हणूनच आपलाही 'खैरनार' होणार नाही, याची काळजी जरांगेंनी घेणे योग्य होईल.

## तृणधान्याचे जाणू महत्त्वमिळेल त्यातून जीवनसत्व

तृणधान्याच्या सेवनामुळे शरीरपोषणासाठी कमी खर्चात अधिक प्रमाणात ऊर्जा तृणधान्यांतून मिळतात. तंतूमय पदार्थाव्यतिरिक्त तृणधान्ये ही खनिजे, बी कॉम्प्लेक्स, जीवनसत्वे, लोह, कॅल्शियम व जस्त यांसारख्या सूक्ष्म पोषक घटकांनी समृद्ध आहेत. तृणधान्याच्या सेवनामुळे रक्तातील ग्लुकोज नियंत्रणात राहते. तृणधान्ये ही आरोग्याला चालना देणाऱ्या फायटोकेमिकल्स, फिनोलिक संयुगे, टॅनिन यांसारख्या घटकांनी समृद्ध असून त्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स गुणधर्म आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२१ च्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, तृणधान्यांमुळे टाईप २ च्या मधुमेहाचा धोका कमी होण्यास व मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये एचबीए १ सी चे प्रमाण कमी होण्यास मदत होऊ शकते.

**तृणधान्ये पचनक्रिया सुधारण्यास मदत**

तृणधान्ये आपल्याला पोषणविषयक सुरक्षा पुरवितात. तृणधान्ये ही तंतूमय पदार्थांनी समृद्ध असलेली धान्य असून ती मानवी आतड्यामधील सूक्ष्म जीवसमूहासाठी चांगले जीवाणू म्हणून कार्य करतात, तृणधान्यांतील तंतूमय पदार्थ स्थूलांत्रे सजल ठेवतात आणि चयापचय क्रिया अतिशय चांगल्या स्थितीत ठेवतात. अशा प्रकारे तृणधान्य ही पचनविषयक आरोग्य चांगले ठेवण्यात योगदान देतात व आतड्यातील हालचाली नियमित ठेवण्यास मदत करतात.

**रागी किंवा नाचणी (फिंगर मिलेट)**

रागी किंवा नाचणी 'आफ्रिकन बाजरी'या नावानेही ओळखली जाते. नाचणी हे सर्वाधिक पोषक तृणधान्य मानले जाते. प्रथिने, तंतूमय घटक व खनिजे यांचा उत्तम स्रोत आहे. नाचणीमध्ये मोठ्या प्रमाणात कॅल्शियम व पोटॅशियम असते नाचणीमध्ये असलेल्या कमी ग्लायसेमिक संवेदनशीलतेमुळे नाचणीयुक्त आहारामुळे मधुमेह असलेल्या व्यक्तीच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यात मदत



होते. रक्तदाब, यकृताचे विकार व दमा आजराच्यावेळी तसेच स्तनपान करणाऱ्या मातांसाठी नाचणीयुक्त आहार घेण्याची शिफारस करण्यात येते. नैसर्गिक लोह भरपूर प्रमाणात असते आणि त्याच्या सेवनामुळे अशक्तपणा दूर होण्यास मदत होते.

**वरई (प्रोसो मिलेट)**

प्रोसो मिलेट पॅनिकम मिलिसेम, चायनीज मिलेट, वऱ्याचे तांदूळ, वरी व हिंदीत चिन आदी नावाने ओळखले जाते. खनिजे, पचनशील तंतूमय घटक, पॉलिफिनॉल्स, जीवनसत्वे (विटॅमिन) व प्रथिनांनी समृद्ध असल्यामुळे आरोग्यासाठी ते बहुगुणी ठरते. ग्लुटेनयुक्त आहाराचा त्रास असलेल्या लोकांसाठी फायदेशीर आहे. वरईमध्ये उच्च पातळीचे लेक्टिनिन असते त्यामुळे मेंदू विषयक आरोग्यासाठी ते उपयुक्त ठरते. याचा ग्लायसेमिक निर्देशांक कमी असून टाईप २ मधुमेह असलेल्या मधुमेहींसाठी उत्तम अन्न ठरते.

**कांगणी किंवा राळ फॉक्सटेल तृणधान्य (सेक्टारिआ इटॅलिका)**

फॉक्सटेल तृणधान्य (सेक्टारिआ इटॅलिका) ही मराठीमध्ये कंगणी किंवा राळ या नावाने ज्ञात असून ग्लुटेनमुक्त धान्य आहे, ज्यात तंतूमय पदार्थ, प्रथिने व खनिजे अधिक प्रमाणात असतात. थियामिन, नियासिन व जीवनसत्व बी-६ आणि मॅग्रेशियम, पोटॅशियम व जस्त या खनिजांचा समावेश असलेला उत्तम स्रोत आहे. कमी शर्करा असलेले अन्न असल्यामुळे रक्तातील साखरचे प्रमाण वाढत नाही. ऑक्सिडीकरण रोधी पदार्थांचा देखील चांगला स्रोत असून त्यामुळे आजारांपासून शरीराचे संरक्षण होण्यास मदत होते.

**भगर-बानयार्ड मिलेटस (इथिनोक्लोआ एस्कुलेंटा किंवा जापानी तृणधान्य)**

भगर हे एक बहुउद्देशीय पिक असून खाद्यान्न व चारा या दोन्हीसाठी त्याची लागवड केली जाते. त्याचे हिंदीमधील सर्वसाधारण नाव सावा व मराठीतील नाव शामुळ आहे. तृणधान्यात प्रथिने, पाचक तंतू, आणि लोह भरपूर प्रमाणात असतात. मॅग्रेशियम, पोटॅशियम व जस्त यासारख्या खनिजांचा उत्तम स्रोत आहे. ग्लुटेनयुक्त पदार्थाची संवेदनशीलता असणाऱ्या लोकांसाठी चांगला पर्याय ठरु शकते.

**सामा किंवा कोराळे-(ब्राऊन टॉप) (उरांचोला रॅमोस एल)**

सामा किंवा कोराळे हे थायमिन, नियासिन व जीवनसत्व बी-६ चा उत्तम स्रोत आहे. दुय्यम पदार्थ म्हणून शिजविता येऊ शकत, वाढता येते, सुप किंवा स्ट्यूमध्ये तसेच पीठात देखील मिसळता येते. पाव, पॅनकेका किंवा इतर भाजलेल्या पदार्थात वापरता येते.

**कोद्रा-(ब्राऊन टॉप)**

कोद्रा तृणधान्यात सुमारे ११ टक्के प्रथिने आहेत, आणि प्रथिनांचे पौष्टिकमुल्य फॉक्सटेल बाजरीपेक्षा किंचित चांगले असल्याचे आढळले आहे, परंतु इतर लहान बाजरींच्या तुलनेत ते जास्त आहे.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान**

पौष्टिक तृणधान्यांचे राज्यातील लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढावी यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान राबविण्यात येत आहे. या माध्यमातून तृणधान्य उत्पादनाला प्रोत्साहन आणि तृणधान्याच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी पीक प्रात्याक्षिके, सुधारित व संकरीत प्रमाणित बियाण्याचे वितरण, कीड व रोग व्यवस्थापनासाठी औषधांचे वितरण, जैविक खते व सूक्ष्म मूलद्रव्यांचा पुरवठा, विविध यंत्रे व कृषी औजारांचे वाटप, शेतीशाळा व शेतकरी प्रशिक्षणांचे आयोजन होत आहे. जिल्हास्तरीय कार्यशाळांद्वारे पौष्टिक तृणधान्य पिकांच्या उत्पादन वाढ व आहारातील वापर वाढ यासाठी विविध उपक्रम राबविण्याकरिता ११० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. नागरिकांसाठी पौष्टिक आहार आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ असे दोन्ही फायदे असल्याने हे अभियान उपयुक्त ठरणारे आहे. **संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

पान १ वरुन

### ३४ केंद्रीय मंत्री रिंगणात, ..

संधी देण्यात आली आहे. याशिवाय, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांना अरुणाचल प्रदेश पूर्व, गोवा- उत्तरमधून केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक, राजकोटमधून पुरुषोत्तम रुपाला, नवसारीमधून मोदींचे विश्र्वासू सी. आर. पाटील, जम्मू-काश्मीरमधील उधमपूरमधून जितेंद्र सिंह, झारखंडमधील गोड्डामधून निशिकांत दुबे याशिवाय, केंद्रीयमंत्री अर्जुन मुंडा, मध्य प्रदेशच्या मंडलामधून फग्गनसिंह कुलस्ते, राजस्थानातील बिकानेरमधून अर्जुनसिंह मेघवाल, कोटामधून लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांना तिसऱ्यांदा संधी दिली आहे. तेलंगणा करीम नगरमधून संजय बंडी, तर सिकंदराबादमधून केंद्रीयमंत्री जी. किशन रेड्डी उमेदवार असतील. लखीमपूर खिरीतील शेतकरी हत्याकांडामुळे वादग्रस्त ठरलेले केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय टेनी यांनाही उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना विदिशा या त्यांच्या पारंपरिक मतदारसंघातून लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिल्पव देब यांना त्रिपुरा पश्र्चिम मतदारसंघातून पहिल्यांदाच संधी दिली आहे. देब राज्यसभेचे सदस्य आहेत. भोपाळमधून प्रज्ञा ठाकूर यांना वगळण्यात आले असून त्यांच्या जागी अलोक शर्मा यांना उमेदवारी दिली आहे.

भाजपने २०१९ मध्ये दिल्लीतील सातही जागा जिंकल्या होत्या. यावेळी आम आदमी पक्ष आणि काँग्रेस यांच्यात आघाडी झाली असल्यामुळे भाजपने नवे चेहरे देऊन विद्यमान खासदारांच्या विरोधी जनमताला आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्या यादीमध्ये पाच उमेदवारांची घोषणा करण्यात आली असून चार नवे उमेदवार देण्यात आले आहेत. नवी दिल्लीतून भाजपच्या ज्येष्ठ नेत्या दिवंगत सुषमा स्वराज यांची कन्या बांसुरी स्वराज यांना पहिल्यांदाच संधी देण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री मीनाक्षी लेखी आणि रमेश बिधुडी, माजी केंद्रीयमंत्री हर्षवर्धन, हंसराज हंस यांना डच्चू देण्यात आला आहे. केवळ मनोज तिवारी यांना पुन्हा संधी दिली गेली आहे.

बसपमधून आलेले विद्यमान खासदार रितेश पांडे यांना आंबेडकरनगरमधून तर, काँग्रेसमधून आलेल्या झारखंडमधील खासदार गीता कोडा यांना सिंहभूम मतदारसंघातून पुन्हा उमेदवारी दिली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी संरक्षणमंत्री ए. के. ॲण्टनी यांचे पुत्र अनिल ॲण्टनी यांना बक्षीस देण्यात आले असून ते केरळमधील पत्तनमतिट्टा मतदारसंघातील उमेदवार असतील. तेलंगणातील बीआरएसमधून आलेले बी. बी. पाटील यांना जहिराबादमधून उमेदवारी दिली आहे.

विद्यमान खासदार जयंत सिन्हा व गौतम गंभीर यांनी निवडणुकीच्या कर्तव्यातून मुक्त होण्याची विनंती पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांना केली असल्याने त्यांच्या नावांचा विचार करण्यात आलेला नाही. यावेळी ३०-४० टक्के विद्यमान खासदारांना डिच्चू दिला जाण्याची चर्चा होती, त्यांत या दोघांचीही नावे होती. त्यामुळेच त्यांनी आधीच लोकसभा निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे.

० अमित शहा, राजनाथ सिंह, स्मृती इराणी, किरेन रीजिजू, सर्बानंद सोनोवाल, श्रीपाद नाईक, पुरुषोत्तम रुपाला, मनसुख मंडाविया, जितेंद्र सिंह, अर्जुन मुंडा, व्ही मुरलीधरन, राजीव चंद्रशेखर, ज्योतिरादित्य शिंदे, फग्गसिंह कुलस्ते, अर्जुनसिंह मेघवाल, भूपेंद्र यादव, गजेंद्रसिंह शेखावत, कैलाश चौधरी, जी. किशन रेड्डी, अजय टेनी, अजय भट, सत्यपाल सिंह बघेल, साध्वी निरंजन ज्योती, निशिथ प्रामाणिक, महेंद्रनाथ पांडे, पंकज चौधरी, अन्नपूर्णा देवी, संजीव बालियान, शांतनू ठाकूर, सुभाष सरकार, भानू प्रताप सिंह वर्मा, कौशल किशोर, देवूसिंह चौहान,

थराज्यनिहाय उमेदवारांची संख्या : उत्तर प्रदेश- ५१, पश्र्चिम बंगाल- २०, मध्य प्रदेश-२४, गुजरात-१५, राजस्थान-१५, केरळ-१२, तेलंगणा-०९, आसाम-११, झारखंड-११, छत्तीसगढ-११. दिल्ली-०७. जम्मू-काश्मीर-०२, उत्तराखंड-०३, अरुणाचल प्रदेश-०२, गोवा०१, त्रिपुरा-०१, अंदमान-निकोबार-०१, दीव-दमण-०१.

भाजपने ज्या राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांशी आघाड्या केल्या आहेत, त्या राज्यांचा निवडणूक समितीच्या बैठकीत विचार करण्यात आला नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील एकाही उमेदवाराची घोषणा करण्यात आली नाही. समितीची पुढील बैठक ४-५ मार्च रोजी होणार आहे.

महाराष्ट्रातील एकाही जागेवर उमेदवारांची घोषणा करण्यात आली नाही. महाराष्ट्रातील दिग्गज नेत्यांचा पहिल्या यादीत समावेश झालेला नसला तरी, पूर्वाश्रमीचे प्रदेश काँग्रेसचे नेते कृपाशंकर सिंह यांचे भाजपने पुनर्वसन केले असून त्यांना उत्तर प्रदेशमधील जौनपूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे.

### आता पाचवी आणि आठवीची..

त्या बालकाला पाचवीच्या वर्गात प्रवेश देण्यात येईल.यामुळे आता शाळेतील प्रवेशाच्या एक टप्प्यावर म्हणजे पाचवीला परीक्षा देत त्याची गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. यामुळे शिक्षक आणि पालक या दोघांचीही शैक्षणिक जबाबदारी वाढणार आहे. यासंबंधीची अधिसूचना जारी करण्यात आली आहे.विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात जाण्यासाठी गुणवत्ता सिद्ध करता यावी म्हणून प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या शेवटी पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यार्थी वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर अशा बालकाला संबंधित विषयासाठी शाळेला अतिरिक्त पूरक मार्गदर्शन द्यावे लागेल आणि वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत त्याची पुनर्परीक्षा घ्यावी लागेल. विद्यार्थी पुनर्परीक्षेत नापास झाले, तर त्यांना पाचवी किंवा आठवीच्या वर्गात, जसे असेल तसे ठेवले जाईल. मात्र, प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बालकाला शाळेतून काढून टाकले जाणार नाही.

## सर्वसामान्यांना प्रतिष्ठा व मध्यवर्ती विकासात स्थान मिळावे ही मुख्यमंत्र्यांची अपेक्षा :उपसभापती डॉ. गोऱ्हे




बारामती : सामान्य लोकांना प्रतिष्ठा व मध्यवर्ती विकासात स्थान मिळावे, ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अपेक्षा असल्याचे प्रतिपादन विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, आज मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या दृष्टिकोनातून उद्योजक आणि प्रशिक्षणार्थी तसेच प्रशिक्षण पूर्ण झालेल्या युवकांसोबत कौशल्य, कला, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाद्वारे संवादाची संधी या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून उपलब्ध केली जात असल्याचे सांगत विभागाचे अभिनंदन केले. तसेच यापूर्वी देखील विभागाने ठिकठिकाणी असे मेळावे घेतले असल्याचे त्यांनी सांगितले.मात नोंदणीकृत उद्योजक ३४७, अधिसूचित केलेली रिक्त पदे ५५ हजार ७२ म्हणजे एवढी रिक्त पदे विविध कंपन्यांमध्ये असून त्यांना योग्य उमेदवारांची अपेक्षा आहे. उमेदवार नोंदणी ३३ हजार १९ आणि स्टार्टअप स्टॉल २६ अस आजच्या कार्यक्रमामध्ये असल्याचे त्यांनी सांगितले.

नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळ अधिवेशनात पेन्शन योजनेच्या संदर्भात सरकारने सकारात्मक निर्णय घेतला आहे, त्याचबरोबर रोजगार, कायदा सुव्यवस्था त्याच्यावर सभागृहामध्ये चर्चा झाली आहे. वेगवेगळ्या प्रकारचे जे मेळावे आहेत त्याच्यामध्ये शासन आपल्या दारी सारखा उपक्रम असेल महिला सक्षमीकरण योजना आहे या सगळ्या योजनांच्याबद्दल देखील उहापोह झाला असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांमार्फत नोकरी इच्छुक युवक व युवती, तसेच नवउद्योजकांच्या कल्पनांना चालना देण्यासाठी पुणे विभागातंर्गत पुणे, सोलापुर, सातारा, सांगली, कोल्हापुर जिल्ह्यातील नोकरीइच्छुक युवक व युवतींसाठी नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन बारामती येथे करण्यात आले. या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री सर्वश्री मंगल प्रभात लोढा, उदय सामंत, दिलीप वळसे पाटील, आमदार दत्तात्रय भरणे, खासदार शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे तसेच सुनेत्रा पवार, संजय घोरपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## मनोज जरांगे पाटील बडबडत राहिले तर मराठा समाज त्यांना जागा दाखवेल, फडणवीसांवरील टीकेनंतर प्रसाद लाडांचा पलटवार

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून मराठा नेते मनोज जरांगे पाटील आणि भाजपच्या नेत्यांमध्ये शाब्दिक युद्ध सुरु असल्याचे दिसत आहे. मनोज जरांगे यांनी अलीकडेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आक्षेपार्ह टीका केली होती. त्यानंतर भाजपच्या नेत्यांनी मनोज जरांगे यांना प्रत्युत्तर देण्याचा सपाटा लावला होता. देवेंद्र फडणवीस यांचे जवळचे सहकारी आमदार प्रसाद लाड यांनी रविवारी मनोज जरांगे यांना लक्ष्य केले. मनोज जरांगे यांनी आपली बडबड बंद करावी. अन्यथा मराठा समाज त्यांना त्यांची जागा दाखवून देईल, असे लाड यांनी म्हटले. ते रविवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. मनोज जरांगे पाटील गेले काही दिवस सातत्याने देवेंद्र फडणवीस यांच्यावर तिखट भाषेत टीका करत आहेत. रविवारीदेखील जरांगे पाटील यांनी फडणवीसांनी आपल्याविरोधात डाव रचल्याचा आरोप केला. यावर प्रतिक्रिया देताना प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे यांना फटकारले. त्यांनी म्हटले की, मनोज जरांगे पाटील यांची पुन्हा एकदा नौटंकी सुरु झाली आहे. ते पुन्हा देवेंद्र फडणवीस यांच्यावर खालच्या भाषेत टीका करु लागले आहेत. ते वैफल्यग्रस्त झालेत. त्यामुळे ते फडणवीसांना ब्राह्मण म्हणून हिणवत आहेत. यापूर्वीही मनोज जरांगेंची स्क्रिप्ट शरद पवारांची होती. आतादेखील ते शरद पवारांची स्क्रिप्ट वाचत आहेत. शिक्षण आणि नोकरीत १० टक्के आरक्षण दिल्यामुळे मराठा समाज सरकारसोबत आहे. मनोज जरांगे अशीच बडबड करत राहिले तर समाज त्यांना नक्कीच जागा दाखवेल, असे प्रसाद लाड यांनी म्हटले.

मनोज जरांगे यांनी रविवारी झालेल्या पत्रकार परिषदेत पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकास्त्र सोडले होते. फडणवीसांमध्ये मराठा द्वेष ठासून भरला आहे. त्यांनी मराठा पोरांवरती खोटे गुन्हे दाखल केले. फडणवीस यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांकडून माझ्यावर हल्ला करण्याचा डाव आहे,

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी हुबेहूब साकारले लोकसभेचे कामकाज

## स्वेरीत 'मेसा' तर्फे 'मॉक पार्लमेंट' हा उपक्रम संपन्न



पंढरपूर/प्रतिनिधीः येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग च्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी अभ्यासाचाच एक भाग म्हणून लोकसभेचे काम कसे चालते याचा बारकाईने अभ्यास करून शैक्षणिक प्रतिसंसद (मॉक पार्लमेंट) चे आयोजन केले होते.

या उपक्रमाच्या माध्यमातून अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साहासह प्रात्यक्षिक सादरीकरणाद्वारे लोकशाहीचे प्रतीक असणाऱ्या संसदेच्या कार्यशैलीवर प्रकाश टाकला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अचूक पद्धतीने प्रदर्शित केलेल्या कौशल्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सध्या संसदेच्या माध्यमातून लोकशाहीचे कामकाज कसे चालते ? हे सर्व विद्यार्थ्यांना समजावे या हेतूने स्वेरीचे संस्थापक सचिव आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व मेकॅनिकल इंजिनीअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस बी. भोसले यांच्या नेतृत्वाखाली, मेसा (मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन) चे समन्वयक प्रा.संजय मोरे यांच्या सहकार्याने भव्य प्रतिसंसद (मॉक पार्लमेंट) आयोजित करण्यात आले होते. यामध्ये अनेक राजकीय नेत्यांची भूमिका साकारताना अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी राजकीय नेत्यांचा हुबेहूब मुखवटा, वेशभूषा, संवाद, हावभाव पाहून राजकीय नेत्यांच्या भूमिका पार पाडल्या. स्पर्धा परीक्षेतही विविध राजकीय बाबींवर प्रश्न विचारले जातात. याच पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांनी अभ्यासाचाच एक भाग म्हणून या प्रतिसंसदेचे आयोजन केले होते. यामध्ये अच्छे दिन, जीएसटी, नोटाबंदी, राफेल, कलम ३७०, भ्रष्टाचार, आर्थिक व्यवस्था, विकास कामे, शिक्षण व्यवस्था, राम मंदिर अशा विविध विषयांवर राजकीय भाष्य करताना राजकीय नेत्यांमधील समतोल राखला गेला. या प्रतिसंसदे मध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी सहभागी झाले होते. अनिल पिसे यांनी सभागृह अध्यक्ष ओम बिर्ला यांची हुबेहूब भूमिका साकारली, दिग्विजय बुरा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका साकारली. त्याचप्रमाणे सत्यजित गोफणे,अभिषेक मोरडे, रोहन क्षीरसागर, सुयश बुरांगे, युवराज इंगळे, मंगेश खपाले, कृष्णा साठे, सुप्रिया शेलार, अंकिता हिंगमिरे,आरती चौगुले, आलिशा मुलांणी, तृप्ती कदम, कोमल पवार, गौरी गावडे, सोनाली कांबळे, प्रणव पाटील, विशाल सोनकांबळे, प्रतीक्षा चौगुले, गजानन वाघमोडे, प्रताप लवळे, समर्थ बहर्जी, निनाद काळे या विद्यार्थ्यांनी विविध राजकीय नेत्यांच्या भूमिका अगदी हुबेहूब साकारल्या. त्यामुळे महाविद्यालय परिसरात एक वेगळे आणि राजकीय वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती इंगळे व अविनाश ननवरे यांनी केले तर सुरज शिंदे यांनी आभार मानले.

# मराठा समाज आक्रमक आमदारपुत्र रणजीत शिंदेंना गाव सोडण्यात भाग पाडले



पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटील : माढा विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे आमदार यांचे पुत्र रणजीत सिंह शिंदे यांनी शनिवारी तुंगत पंढरपूर तालुका येथे मराठा समाजातील युवकांनी अडवलेले तुम्ही कुणबी झालात पण मराठा समाजासाठी काय केले तासात जाब मराठा समाजासाठी काय केली तसा जाब विचार त्याचा कार्यक्रमास घेण्यास विरोध करून गाव सोडण्यात भाग पाडले

रणजीत शिंदे शनिवारी पंढरपूर तुंगत येथे शासकीय योजनेतील विकास कामाचा शुभारंभ सोहळ्यासाठी आले होते एका ठिकाणी कार्यक्रम उरकून गावातील दुसऱ्या पिकांच्या कार्यक्रमासाठी रणजीत शिंदे हे जात असताना गावातील सकल मराठा समाजाने तरुणांनी त्यांना घेरावा घालून जाब विचारला रणजीत शिंदे यांच्याकडे कुणबी जात प्रमाणपत्र असून याच प्रवर्गातून त्यांनी पंचायत समितीचे सभापती भूषवले आहे त्याचबरोबर मनोज जरांगे यांच्या पंढरपूर येथील सभेला पैसा दिलेला दावा त्यांनी केला होता त्यानंतर मराठा समाजाच्या फोनपेवर एक एक रुपया पाठवून निषेध नोंदवला होता या पार्श्र्वभूमीवर गावात आलेल्या रणजीत शिंदे यांना युवकाने अडवले व समाजासाठी काय केले असा जाब विचारला.तुमचे वडील पंधरा वर्षापासून आमदार आहेत व त्यांनी समाजासाठी काय केले विधानसभा ग्राहक मराठा आरक्षणाबाबत कधीच आवाज उठवला नाही शिंदे कुटुंबाचे कुणबी प्रमाणपत्र मिळावे मिळवले पण समाजातील इतर लोकांना मिळवून देण्यासाठी तुम्ही काय केले असा सवाल उपस्थित करून मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून कधीच सभागृहात आवाज उठवला नाही यापुढे गावात यायचे असेल तर समाजातील विचार करून या सकल मराठा समाज एक लाख मराठा एक कोटी मराठा शिंदे यांच्याबरोबर असलेल्या कार्यकर्त्यांना गावातून बाहेर जाण्यास भाग पाडले त्यावेळी मोठ्या संख्येने सकल मराठा समाजाची युवक उपस्थित होते

## निंबध स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

# राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचा उपक्रम कौतुकास्पद : माजी आ. दिपक साळुंखे पाटील



पंढरपूर/प्रतिनिधीः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने संकेत ढवळे यांनी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर निंबध लेखन केले आहे. लहान मुलांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देण्यासाठी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या माध्यमातून संकेत ढवळे यांनी राबविलेला उपक्रम कौतुकस्पद आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी आ. दिपकआबा साळुंखे-पाटील यांनी सांगितले.

राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्यावतीने आयोजित केलेल्या निंबध स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळया प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी सहकार शिरोमणी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे, माजी उपनगराध्यक्ष गणेश अधटराव, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दिगंबर सुडके, राष्ट्रवादी युवकचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे, पंढरपूर कार्याध्यक्ष शुकुर बागवान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक शहराध्यक्ष अमोल परबतराव आदी मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतनिमित्त 'राज्य रयतेचे-जिजाऊंच्या शिवबाचे' या स्वराज्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

यानिमित्त राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश संकेत ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दि. २ मार्च रोजी दुर्गा प्रशाला इसबावी पंढरपूर येथे करण्यात आला.

यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देवून सन्मानित करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश शिंदे, सुनील जाधव, योगेश जाधव, विजय काळे, शाळेचे संस्थापक डॉ संतोष दोशी, सचिव मलपे, दत्तात्रय माने, गजानन ननवरे, वरद ननवरे, बंटी घोगरदरे, अजित खिलारे, शुभम शिरकर, शुभम पवार, गणेश झेंड आदींनी परिश्रम घेतले.

# पंढरपूर तालुका पोलिसांची वाळू माफिया विरोधात मोठी कारवाई




पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटीलः पंढरपूर तालुका पोलिसांचे वैद्य वाळू माफिया विरुद्ध मोठी कारवाई सदर कारवाई मध्ये दोन पिकप गाड्या जप्त तसेच दोन ब्रास वाळू जपून दहा लाख रुपये बारा हजार रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर यांनी दिली

सदर कारवाई मौजे शेगाव धुमाळ तालुका पंढरपूर मशानभूमी जवळी असलेल्या भीमा नदी पात्रातून अवैधरित्या विनापरवाना पर्यावरणाचा ऱ्हास होईल हे माहीत असताना सदर इसमाने वाळू चोरून वाहनांमध्ये भरत असताना पोलीस आले असता पिकप दोन वाहने रस्त्यावर सोडून पळून गेले म्हणून अंगद दुर्योधन चव्हाण महेश अरुण आटकळे राहणार सेवा दुमाला तालुका पंढरपूर यांच्या विरोधात सरकार तर्फे भादवी कलम ३७९ खजिना कायदा कलम ४(१)४क१.२१ ज्याप्रमाणे कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली. सदर कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सर देशपांडे अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर एचडी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर तोंडले पोलीस हेडकॉन्स्टेबल सुनील मोरे गजानन माळी पोलीस कॉन्स्टेबल राहुल जगताप नलवडे यांच्या पथकाने केली व सदर कारवाई रात्रीच्या वेळी केली आहे

# पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची अवैध दारू विक्रीवर करणाऱ्या कारवाई २१ हजार रुपये चा मुद्देमाल जप्त




पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी अवैधरित्या विक्री करणाऱ्या दारू अवैध धंद्यावर दहा टाकून २१ हजार रुपये चा मुद्देमाल जप्त केला आहे

पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची अधिकारी व स्थापने पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे खर्डी तालुका पंढरपूर ओझेवाडी या गावात येथे रेट टाकून एकूण किंमत रुपये २१००० दोनशे रुपये चा मुद्देमाल जप्त केलेला असून खर्डी येथील दोघाविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात प्रक्रिया चालू आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सर देशपांडे साहेब माननीय अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर विभागीय पोलीस अधिकारी ड्रॉ अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर सहाय्यक फौजदार तोंडले पोलीस हवालदार गजानन माळी पोलीस आमदार सुनील मोरे पोलीस कॉन्स्टेबल नलवडे पोलीस कॉन्स्टेबल वाडदेकर पोलीस कॉन्स्टेबल सुधीर शिंदे पोलीस कॉन्स्टेबल चंदनशिवे हनुमान शिंदे यांच्या पथकाने केली आहे

# टाकळीवाडी गावामध्ये पल्स पोलिओ मोहिमेस उत्तम प्रतिसाद



पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ गावामध्ये आशा वर्कर यांच्या जोरदार प्रयत्नामुळे टाकळीवाडी गावामध्ये पल्स पोलिओ मोहीम १००% यशस्वी झाली. पल्स पोलिओ मोहिमेस उत्तम प्रतिसाद लाभला.०ते ५ वयोगटातील बालकांना पल्स पोलिओ डोस देण्यात आला. डॉ.युवराज कोळी,आरोग्य सहाय्यक ए.बी.पाटील,शुभांगी मोहिते यांनी पोलिओ बूथ ना भेटी देवून मार्गदर्शन व सूचना दिल्या. यावेळी आशा वर्कर सौ सुवर्णा माने, सौ लता निर्मळे, सौ.छाया बळी यांचे मोलाचे परिश्रम लाभले.

# वागदरी व बोळेगाव येते पोलीओ लसीकरण



वागदरी(एस.के.गायकवाड):तुळजापूर तालुक्यातील जि.प.प्राथमिक आरोग्य केंद्र नळदुर्ग अंतर्गत येणाऱ्या मौजे वागदरी आणि जि.प.प्राथमिक आरोग्य केंद्र जळकोट अंतर्गत येणाऱ्या मौजे बोळेगाव या ठिकाणी शुन्य ते पाच वयोगटातील बालकांना पोलीओ डोस (लसीकरण) पाजण्यात आले .

आजचा बालक हा उद्याचा आपल्या देशाचा जबाबदार नागरिक असुन देशाचे भवितव्य अप्रत्यक्ष पणे त्यांच्या हाती जाणार आहे. तेव्हा भविष्यात कोणत्याच बालकांना अपंगत्व येऊ नये म्हणून शासनाच्या आरोग्य विभागा मार्फत सामाजिक बांधिलकी या नात्याने दरवर्षी शुन्य ते पाच वयोगटातील बालकांना गावा गावात पोलीओ डोस पाजण्याची व्यवस्था केली जाते.

त्याचाच एक भाग म्हणून तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी व बोळेगाव येथे अंगणवाडी केंद्रात बालकांना पोलीओचा डोस पाजण्यात आला. वागदरी येते अंगणवाडी केंद्रात प्रथमिक आरोग्य केंद्र नळदुर्ग च्या वतीने पोलीओ डोस पाजण्याची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी आशा कार्यकर्ती पार्वती बिराजदार, अंगणवाडी कार्यकर्ती पद्मिनी पवार, मदतनीस रूपाली जाधव यांनी वागदरी येथील शुन्य ते पाच वयोगटातील बालकांना पोलीओ डोस पाजण्याचे कम चोख बजावले. तर जळकोट प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत येणाऱ्या बोळेगाव येथे सरपंच विलास पाटील यांच्या हस्ते पोलीओ डोस पाजण्याची सुरुवात करण्यात आली.यावेळी आरोग्य सेवक विरभद्र आसुरे,अंगणवाडी सेविका मंगलबाई मदणे,सामाजिक कार्यकर्त्या संगीता सुरवसे यांनी बालकांना पोलीओ डोस पाजण्याचे काम पाहिले.

# उडगी केंद्र शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील उडगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड व मराठी केंद्र शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पाडले.अध्यक्षस्थानी धोंडप्पा यळमेली होते.प्रथमतः क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व सरस्वती मतेच्या प्रतिमेचे पूजन रामचंद्र म्हेत्रे,महादेव येळमेली यांच्या हस्ते करण्यात आले. स्टेज पूजा धोंडूराज बनसोडे तर दीपप्रज्वलन ओंकारेप्पा हारकुड, रमेश जिगजंबगी,सुरेश मडयाळ,अंकुश नारायणकर तर वाद्यपूजा उपसरपंच सुनील मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. स्नेहसंमेलनचे उदघाटन नूतन सरपंच बसवराज कोळी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी चिमुकल्यांनी आपल्या कला सादर करित देशभक्तीपर गीत,जानपद, लावणी,गोंधळगीत,विनोदी नाटक, मराठी,हिंदी व कन्नड सिनेमातील गाण्यावर अप्रतिम नृत्याविष्कार सादर करीत उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी नागरिकांनीही त्याच्या कलेला दाद देत त्यांच्यावर भेटवस्तू व बक्षिसांचा वर्षाव करुन कौतुक करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणून केंद्र प्रमुख भीमराव धडके, राजशेखर उंबराणीकर पंचप्पा शिवमूर्ती, कलल्पा अळगी,अशोक भांड,संजय जानराव,महादेव धानशेट्टी,पिरप्पा कुंभार देवेंद्र नारायणकर आदी मान्यवर उपस्थित होते.प्रमुख उपस्थिती यासीन मुजावर,संतोष बिराजदार, स्वामीनाथ आलुरे,सिद्धू महामुनी, खाजाभाई चंदनवाले,देविदास फुलारी इत्यादी होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केंद्रीय मुख्याध्यापक श्रीमंत पुजारी,भौरम्मा मठपती,निलोफर फणीबंद, शरणू कोळी,कृष्णा शिंदे,मंगलदास यराळ,एम. बी.इमानदार,मुख्याध्यापक विठ्ठल कटारे,किसन जाधव, प्रभावती माशाळे, या कार्यक्रमाचे आयोजिक शालेय समिती अध्यक्ष कलल्पा कामा,सिद्रय्या सोड्डे,अंबण्णा तांबे,प्रभावती कुसेकर,धनराज येळमेली आदींनी परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनास विद्यार्थी, पालक,युवावर्ग आणि ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कासीम कोटनाळ, उमेश कोळी तर आभार बसवराज अष्टगी यांनी मानले.



## न्यासाकडून नेहमीच शासनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमातील योगदान : डॉ. सुहास माने

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वछस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून नेहमीच शासनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमातील योगदान मोलाचे असल्याचे मनोगत सोलापूर छत्रपती शिवाजी महाराज सर्वोच्च रुग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने यांनी व्यक्त केले.

रविवारी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या परिसरात पल्स पोलिओ लसीकरणाचा शुभारंभ सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी डॉ. सुहास माने हे बोलत होते.पुढे बोलताना डॉ. सुहास माने म्हणाले की, पल्स पोलिओ लसीकरण हे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात शासनाच्या आरोग्य विभागाकडून नियोजनानुसार वेळोवेळी आयोजित करण्यात येत असते. त्या प्रमाणे यंदाही पल्स पोलीओ लसिकरणाचे आयोजन मंडळात करण्यात आले असून, न्यासाच्या वतीने शहरातील पल्स पोलिओ लसीकरण बूथवर कर्मचाऱ्यांकरिता भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे, ही बाब उल्लेखनीय असून, जिल्ह्यातील शासनाच्या विविध कार्यक्रमात भाग घेणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे एकमेव असल्याचे डॉ.माने म्हणाले.

पुढे बोलताना शामराव मोरे म्हणाले की,अन्नछत्र मंडळात महाप्रसाद घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या लहान मुलांकरिता व मंडळाच्या आजूबाजुच्या परिसरातील नागरिकांनी आपल्या मुलांकरिता सदर लसिकरणाचा लाभ घ्यावेत असे आवाहन करून अन्नछत्र मंडळात ही लसीकरण मोहीम पुढील आठवडाभर चालणार असल्याचे शामराव मोरे म्हणाले.

याप्रसंगी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रवींद्र बनसोडे, डॉ.सतीश बिराजदार, वैद्यकीय सहायक जे.डी.ढगे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ परतरेड्डी गवंडी, सहाय्यक अधीक्षक युसुफ शेख, शंकर कुंभार, प्रदीप सुरवसे, न्यासाचे अभियंता किरण पाटील, एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, शहाजीबापू यादव, सतिश महिंद्रकर, नामा भोसले, चंद्रकांत हिबारे, अतिष पवार, शावरेप्पा माणकोजी, मल्लिकार्जुन कोगणुरे, कल्याण देशमुख, दत्ता माने, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



## ग्रामीण रुग्णालयात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पोलीओ लसीकरण शुभारंभ

अक्कलकोट/प्रतिनिधीः शासनाच्या वतीने राबविण्यात येणारया पल्स पोलिओ लसीकरणाचे शुभारंभ अक्कलकोट विधानसभा आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ सुहास माने , डॉ रवींद्र बनसोडे , भाजपा तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, डॉ. कुलकर्णी, यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. ही लसीकरण मोहीम पुढील आठवडाभर चालणार आहे. या उपक्रमास ग्रामीण रुग्णालयातील गवंडी, श्री . ढगे, श्री. मुजावर, सलगरे आदी उपस्थित राहून परिश्रम घेत आहेत,

## वटवृक्ष मंदिरात पोलीओ लसीकरण शुभारंभ



अक्कलकोट/प्रतिनिधीः शासनाच्या वतीने राबविण्यात येणारया पल्स पोलिओ लसीकरणाचे शुभारंभ शासन नियोजीत तारखेप्रमाणे रविवारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ सुहास माने , डॉ रवींद्र बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री वटवृक्ष मंदिरात समितीचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक महेश इंगळे यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना इंगळे यांनी पल्स पोलिओ लसीकरण हे वटवृक्ष मंदिरात शासकीय नियोजनानुसार वेळोवेळी आयोजित करण्यात येत असते. त्या अनुशंगाने यंदाही पोलीओ लसिकरणाचे आयोजन मंदिरात करण्यात आल्याची माहिती इंगळे यांनी दिली.

पुढे बोलताना इंगळे यांनी मंदिरात श्रींच्या दर्शनाकरिता येणारया भाविकांच्या लहान मुलांनी व मंदिराच्या आजूबाजुच्या परिसरातील नागरिकांच्या पाल्यांनी या लसिकरणाचा लाभ घ्यावा. कोणतेही बालक पोलिओ लसिकरणास वंचित राहु नये या करीता जे भाविक घर सोडून देवदर्शनाकरीता येथे येतात त्यांच्या बालकांकरीता येथे पोलीओ लसिकरणाचे आयोजन करण्यात येत असल्याचे मनोगत व्यक्त केले.

वटवृक्ष मंदीरातील ही लसीकरण मोहीम पुढील आठवडाभर चालणार आहे. या उपक्रमास ग्रामीण अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे अंजली खरात, व्ही.कोटनूर, सविता बिराजदार, विजयालक्ष्मी लोहार, पल्लवी जाधव, सुप्रिया नाईक, रेश्मा लोणारे, कुंभार आदी उपस्थित राहून परिश्रम घेत आहेत, तर या लसीकरणाच्या शुभारंभाप्रसंगी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, महेश गोगी, श्रीशैल गवंडी, संजय पवार, सागर गोंडाळ, रविराव महिंद्रकर, संतोष जमगे, गिरीश पवार, प्रसाद सोनार,आदींसह स्वामीभक्त व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात अक्कलकोट तालुका स्तरावर जि.प.मराठी शाळा शिरवळवाडी तृतीय क्रमांक

अक्कलकोट/प्रतिनिधीः निरोगी जमिनीत वाढणाऱ्या विद्यार्थीरूपी रोपट्याभोवती संस्कारच्या एका वलय निर्मितीसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. निलीमा सुपुत्र जाधव, शाळेचे शिक्षक, श्रीम शिलू दोडतले, श्री ज्ञानेश्र्वर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय उपक्रम, विद्यार्थी बचतबँक, रंगरंगोटी, वर्ग सजावट अशा अनेक अनेक बाबींच्या विविध उपक्रम राबविले आहेत यांची दखल घेत तालुका स्तरावर तृतीय क्रमांक जिल्हा परिषद शाळा शिरवळवाडी यांना मिळाले आहे

'माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी सौ मनिषा आव्हाळे मॅडम, शिक्षणाधिकारी सौ तृप्ती अंधारे , गटशिक्षणाधिकारी श्री प्रशांत अरबाळे, विस्तार अधिकारी दयानंद कवडे , न प केंद्रप्रमुख गौरीशंकर कोळी , व वागदरी केंद्राचे उपमुख बसवराज मुनोळी मार्गदर्शन लाभले.

शाळेचे स्पर्धेतील यश संपादन केल्याबद्दल शिरवळवाडी सरपंच . स्नेहा हनुरे , शाळा व्यवस्थापन समिती- अध्यक्ष - श्रीम अंबिका सिध्दारामु





शिरंगापुरे, उपाध्यक्ष- श्री बसय्या स्वामी सर्व सदस्य,उपसरपंच, पोलीस पाटील, यांनी शुभेच्छा दिले गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिक्षक श्री. नागनाथू मिरजे व अर्चना गिरी यांचे सहकार्य लाभले,





## उल्हासनगर येथे ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे सकल भारतीय समाज निर्भय बनो सभा

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे :उल्हासनगर सुभाष टेकडी तक्षशिला विद्यालय येथे निर्भय बनो सभा संपन्न या सभेला जेष्ठ पत्रकार निखिल वागळे प्रमुख मार्गदर्शक होते तसेच या कार्यक्रमास. मॅक्स महाराष्ट्र चे प्रत्रकार किरण सोनवणे सर व कायद्याने वागा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री राज असरोंडकर सर रिपब्लिकन सेक्युलर पार्टीचे अध्यक्ष श्याम दादा गायकवाड तसेच विविध संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी जेष्ठ पत्रकार निखिल वागळे यांनी आलेल्या नागरिकांना आपल्या विचारातून मानले की येणारे निवडणूक लोकसभा व विधानसभा ही शेवटची असू शकते यापुढे निवडणूक होईल किंवा नाही याचं काही सांगता येत नाही म्हणून आपण जागृत राहुन लोकशाही टिकावी व सविधान वाचवण्याकरिता आपण जे मत देत आहोत ते वाया जात तर नाहीं याचा विचार करावा असे मत व्यक्त केलं

## राज्य अधिस्वीकृती समितीच्या बैठकीस प्रारंभ

नागपूर : महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसार माध्यम अधिस्वीकृती समितीच्या दोन दिवसीय बैठकीस येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, सहपोलीस आयुक्त अश्र्वती दोरजे आणि नागपूर खंडपीठाचे माहिती आयुक्त राहुल पांडे



यांच्या उपस्थितीत आज प्रारंभ झाला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी होते. यावेळी माहिती संचालक तथा समितीचे सदस्य सचिव डॉ.राहुल तिडके, नागपूर विभागाचे माहिती संचालक हेमराज बागुल, मराठवाडा विभागाचे माहिती संचालक किशोर गांगुर्डे तसेच राज्य अधिस्वीकृती समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.डॉ. इटनकर यांनी प्रशासनातील कारकिर्दीत प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधीं सोबतच्या सौहार्दपूर्ण संवादाचे अनुभव कथन केले. तसेच, येत्या लोकसभा सार्वत्रित निवडणुकीत प्रसारमाध्यमांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

अश्र्वती दोरजे म्हणाल्या की, पोलीस आणि पत्रकार हे जनतेला न्याय देण्याचे काम करतात. पोलीस गुन्ह्यातील सत्य शोधून काढतात तर पत्रकार हे सत्य जनतेसमोर मांडतात.राहुल पांडे यांनी सांगितले, पत्रकारांजवळ लेखणीचे शस्त्र असून त्याचा सुयोग्य उपयोग व्हावा. राज्य अधिस्वीकृती समितीने पात्र व योग्य पत्रकारांस अधिस्वीकृती पत्रिका देण्याची व याचा सुयोग्य वापर व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.अध्यक्षीय संबोधनात यदू जोशी म्हणाले, माहितीच्या अधिकाराबाबत यशदा पुणे यांच्या मार्फत राज्यातील पत्रकारांना विभाग निहाय प्रशिक्षण देण्याबाबत पुढाकार घेण्यात येईल. तसेच, अधिस्वीकृती पत्रिका योग्य पत्रकारांना मिळण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

संचालक (माहिती/प्रशासन) हेमराज बागुल यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. राहुल तिडके यांनी आभार मानले. नागपूर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष रमेश कुळकर्णी आणि सदस्यही यावेळी उपस्थित होते.माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर संचालक कार्यालयाच्यावतीने अधिस्वीकृती समितीच्या चौथ्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या समितीचे राज्याच्या विविध विभागातील सदस्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या सर्व विभागांचे संचालक, उपसंचालक या बैठकीसाठी उपस्थित असून ३ मार्च २०२४ पर्यंत ही बैठक चालणार आहे.

## आरेगांव येथे पल्स पोलीओ मोहीम यशस्वी



आरेगांवः राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने 'दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी' हे घोषवाक्य घेऊन ३ मार्च २०२४ रोजी संपूर्ण राज्यात पोलिओ लसीकरण मोहीम राबविली आहे. मेहकर तालुक्यातील आरेगांव येथे या मोहिमेला सकाळी ठिक आठ वाजता गावच्या संरपंचा दिपाली सदावर्ते यांच्या हस्ते सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून आणि प्रणव सदावर्ते याला पहिला डोस पाजुन सुरवात करण्यात आली. जागतिक आरोग्य संघटनेने २७ मार्च २०१४ रोजीच भारताला पोलिओ मुक्त देश म्हणून घोषित केले आहे. तरीही भविष्यातही पोलीओचा रुग्ण आढळू नये म्हणून राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने पोलिओ लसीकरण मोहीम हाती घेतली आहे.

वयवर्षे ० ते ५ वर्षे वयोगटातील कोणतेही बालक पोलिओ लसिकरणापासुन वंचित राहु नये यासाठी आरेगांव येथील आरोग्य सेविका, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी अगोरदच पुर्वनियोजन म्हणून पोलीओ विषयी गावात घरोघरी जाऊन जनजागृती केली. पोलिओ लसिकरणाच्या दिवशी ही राष्ट्रीय मोहीम यशस्वी करण्यासाठी गावच्या सरंपंचा दिपाली सदावर्ते, आरोग्य सेविका बि. एच केसकर, आशा वर्कर्स सुनिता भगत, प्रज्ञा सदावर्ते, सिमा काटेकर अंगणवाडी सेविका आशा सदावर्ते, संगिता वायाळ,दुर्गा साखरे अंगणवाडी मदतनीस मालता टाले, सविता दाभाडे, कविता टेकाळे, सिमा सदावर्ते या उपस्थित होत्या. राष्ट्रीय मोहीम स्वतः ची जबाबदारी समजून सर्वांनी नियोजनपुर्ण काम करून हि मोहीम यशस्वी केली.

# अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिर भारतीयांचे तीर्थक्षेत्र होईल : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ठाणे : ज्याप्रमाणे अमरनाथ हे भारतीयांसाठी तीर्थक्षेत्र आहे त्याचप्रमाणे अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिर भारतीयांसाठी तीर्थक्षेत्र बनेल, असा विश्र्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिर परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते





यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून ) रवींद्र चव्हाण, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार सर्वश्री डॉ. बालाजी किनीकर, किसन कथोरे, कुमार आयलानी, ड.मनीषा कायंदे, माजी आमदार रवींद्र फाटक, अयोध्येतील राम जन्मभूमी ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज आदी मान्यवर उपस्थित होतेवाढत्या शहराची गरज लक्षात घेऊन शहराचा विकास करण्यात येणार असून यासाठी निधी कमी पडणार नाही. राम जन्मभूमी येथे राम मंदिराची निर्मिती करून करोडो भारतीयांचे स्वप्न साकार केल्याबद्दल प्रधानमंत्री श्री.मोदी यांचे अभिनंदन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.